गायत्री सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.
पत्ता :-स.नं.२८२,प्लॉट नं.७२/७८,तानाजी नगर,चिंचवड,पुणे.४११ ०३३
नोंदणी क्र.:-पी.एम.ए./एच.एल.आय./एच.एस.जी./टी.सी./१२१६/८७-८८

दिनांक:-२६/०५/२०२३

## पुनर्विकास विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

गायत्री सहकारी गृहरचना संस्थेची इमारतींच्या पुनर्विकासा संदर्भात, विकासकांचे सादरीकरण बाबत रविवार दिनांक १९.०५.२०२४ रोजी सकाळी ठिक १०.०० ते दुपारी ०३.०० वाजता अक्षय हॉल,देवधर कॉलनी,चिंचवड येथे आयोजित करण्यात आली होते. सदर मिटींगमध्ये प्रत्यक्ष सभासद म्हणुन उपस्थित असणाऱ्यांची संख्या २१ इतकी होती. संस्थेचे पुनर्विकास प्रकल्प संस्थेचे सल्लागार श्री.संजय सुर्यवंशी यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले आणि त्यानंतर विकासकांना सादरीकरण करण्यासाठी अनुमती देण्यात आली.

**विषय क्रमांक ०१:-** एकूण ०४ विकसकांनी टेंडर प्रेझेंन्टेशन बाबतीत सादरीकरण करणे.

**ठराव क्रमांक ०१:-** संस्थेसाठी निवड केलेल्या एकुण ०६ विकसकांना निविदा सादरीकरणासाठी आमंत्रित केले होते.त्यातील ०४ विकसकांनी सादरीकरण केले. प्रत्येक विकसकाला एकुण ४५ मिनिटांचा स्लॉट देण्यात आला होता त्याप्रमाणे प्रत्येक विकसकाने आपाआपले टेंडर शिस्तबध्दरित्या सादरीकरण केले.

सर्वात प्रथम मेसर्स.यशस्वी ग्रुपचे श्री.मुंगसे सर यांनी आपले निविदा सादर केले या कंपनीचे २ पार्टनर आहेत त्यापैकी योगेश मुंगसे यांनी खुप छान पध्दतीने टेंडर प्रेझेंन्टेशन सादर केले सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देखील समाधानकारक देण्यात आले.

त्यानंतर मेसर्स. एमबी कंपनीचे यश फिरोदिया आणि श्री.इंगवल सर यांनी त्यांच्या कंपनीची सुरुवात कशा स्वरूपात चालु करून त्याचा वटवृक्ष कशा पध्दतीने उभा केला आहे याबद्यलची माहिती, जी संस्थेकडे ऑफर भरून देण्यात आली ती सिंगल आणि सोबतच्या बिल्डींगसोबत आपली बिल्डींग अमलगमेट झाली त्याबाबतीतल सविस्तर माहिती दिली. आणि त्यांनी कोणत्या भागामध्ये किती स्क्वे.फुटाचे काम केले आहे यासदंर्भातील माहिती सभासदांना दिली. त्यानंतर सभासदांचे प्रश्न-उत्तराचेही देखील योग्य पध्दतीने निरसन केले.

त्यानंतर जे तिसरे विकसक मेसर्स.वसुधा ग्रुपचे श्री.चैतन्य सोले आणि सिध्देश गोलांडे यांनी जी संस्थेकडे ऑफर भरून देण्यात आली ती सिंगल आणि सोबतच्या बिल्डींगसोबत

आपली बिल्डींग अमलगमेट झाली त्याबाबतीतल सविस्तर माहिती दिली. त्यानंतर संस्थेसाठी काही स्पेसिफिकेशन कशा पध्दतीने देणार या संदर्भातील विस्तृत माहिती देण्यात आली.

त्यानंतर चौथे विकसक मेसर्स.स्वामी डेव्हलपर्सचे डायरेक्टर यांनी प्रथमत: आपल्याला टेंडर स्वरूपात भरून दिलेल्या निविदेची संपुर्ण माहिती दिली त्यानंतर संस्थेसाठी ॲमिनिटीज कशा पध्दतीने असतील याची माहिती देऊन संस्थेसाठी प्लॅन स्वरूपात आपली बिल्डींग कशी बसेल याची सुध्दा संपुर्ण माहिती संस्थेसमोर सादर करून सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देखील समाधानकारक देण्यात आले.

सुचक:-श्री.विजय देशमुख अनुमोदक:- सौ.अलका र.इनामदार

<u>विषय क्रमांक ०२:-</u> वरील विकसकांबरोबर पुढील कार्यवाहीचे स्वरूप ठरविणे.

<u>ठराव क्रमांक ०२:-</u> एकूण ०४ विकसकांनी टेंडर प्रेझेंन्टेशन सादर केल्यानंतर संस्थेचे पुनर्विकास प्रकल्प संस्थेचे सल्लागार श्री.संजय सुर्यवंशी यांनी सर्व विकसकांचे संस्थेच्या सभासदांच्या वतीने आभार मानले. सर्व विकसकांच्या बिल्डर साईट व्हिझिट करण्यासाठी प्रत्येकी २ साईट सभासदांना बघायच्या आहेत त्याप्रमाणे प्रत्येक बिल्डरला आधी एक आठवडाभर तसे कळवण्यात येईल असे सर्व सभासदांसमोर सांगितले. वरील ठरावाअंती संस्थेचे पुनर्विकास प्रकल्प सल्लागार श्री.संजय सुर्यवंशी आणि त्यांची पुर्ण टिम यांचे पुनर्विकास समितीर्फे आभार मानले आणि कार्यकारणी मंडळातर्फे सर्व सभासदांसाठी भोजनाची व्यवस्था सुध्दा केली होती आणि त्याचा आस्वाद सर्व सभासदांनी घेतला.

दिनांक ०८-०६-२०२४ रोजी बिल्डर साईट व्हिझिट करण्यात आले, त्यातील प्रथम विकसक यशस्वी ग्रुप यांच्या २ साईट व्हिझिट करण्यात आल्या त्यानंतर दुसरे विकसक वसुधा डेव्हलपर्स यांच्या २ साईट व्हिझिट करण्यात आल्या आणि त्यानंतर तिसरे विकसक एमबी ग्रुप यांच्या २ साईट व्हिझिट करण्यात आल्या. अशाप्रकारे तिनही विकसकांच्या साईट व्हिझिट संध्याकाळपर्यंत करण्यात आल्या.

सुचक:-श्री.शैलेश कुलकर्णी

अनुमोदक:-श्री.प्रमोद पानसे

**<u>ठराव सर्वसंमत</u>**

गायत्री सहकारी गृहरचना संस्थेच्या वतीने

गायत्री सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
नोंदणी क्र. पीएनए/(एचएलआय)/(टिसी)/१२१६/८७-८८ दि. १-३-८८

गायत्री सहकारी गृहरचना संस्था मर्यादित

अध्यक्ष सचिव